कार्यालय पोलीस उप अधीक्षक
अँटी करप्शन ब्युरो,उस्मानाबाद

## प्रसिध्दी पत्रक

दिनांकः-17/04/2021

**१) अमृत पांडुरंग बंडगर, वय-५२ वर्षे, वरिष्ठ लिपीक, प्रभारी दुय्यम निबंधक श्रेणी-१, ने. दुय्यम निबंधक कार्यालय, कळंब रा.धारुर ता.जि.उस्मानाबाद ह.मु.भवानी चौक, नृसिंह मंदिराचे पाठीमागे समता नगर, उस्मानाबाद (वर्ग- ३) खाते-(महसुल) नोंदणी कार्यालय व इतर दोन यांनी तक्रारदाराकडे 10,000/- रुपये लाच रककम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबादच्या जाळयात**

| | |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव, हुद्दा व पत्ता | १) अमृत पांडुरंग बंडगर, वय-५२ वर्षे, वरिष्ठ लिपीक, प्रभारी दुय्यम निबंधक श्रेणी-१, ने. दुय्यम निबंधक कार्यालय, कळंब रा.धारुर ता.जि.उस्मानाबाद ह.मु.भवानी चौक, नृसिंह मंदिराचे पाठीमागे समता नगर, उस्मानाबाद (वर्ग- ३) खाते-(महसुल) नोंदणी कार्यालय<br>२) गणेश गोपीनाथ फावडे, वय ४० वर्ष, दस्तलेखक, दुय्यम निबंधक कार्यालय, कळंब, रा. पुनर्वसन सावरगाव, कळंब (खा.ई)<br>३) विठ्ठल गोरोबा गहुदळे, वय ३८ वर्ष, ड्रायव्हर, रा. पळसवाडी, ता.जि.उस्मानाबाद ह.मु.तांबरी विभाग, सचिन देशमुख यांचे दवाखान्याजवळ, उस्मानाबाद (खा.ई.) |
| गुन्हयाचा दिनांक व ठिकाण | दि.16.04.2021 रोजी दुय्यम निबंधक कार्यालय, कळंब येथे |
| तपासी अधिकारी | गोरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक,<br>लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद |
| लाचेची रक्कम मागणी | 10,000/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचेकडे त्यांचे पक्षकाराचे जमीनीचे खरेदीखतासाठी |

यातील तक्रारदार हे खरेदीविक्री मसुदा तयार करण्याचा व्यवसाय करीत असुन तक्रारदार यांच्या मोहा येथील पक्षकाराचे गट नं.1117 मधील 78 आर जमीनीचे खरेदीखत करुन देण्यासाठी दुय्यम निबंधक कार्यालय, कळंब येथील बंडगर, प्रभारी दुय्यम निबंधक यांनी तक्रारदार यांचेकडे 10,000/- रु लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना त्यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी दि. 08.04.2021 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,उस्मानाबाद येथील पोलीस निरीक्षक गौरीशंकर पाबळे यांचेकडे तक्रार दिली होती.

सदर तक्रारीचे अनुषंगाने दि.08.04.2021 रोजी बंडगर, प्रभारी दुय्यम निबंधक, कळंब यांची दुय्यम निबंधक कार्यालय, कळंब येथे लाच मागणी पडताळणी केली असता त्यांनी तक्रारदार यांचेकडे नमुद कामासाठी 10,000/- रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे दि.08.04.2021, 09.04.2021, 15.04.2021 रोजी सापळयाचे आयोजन केले असता त्यांनी लाच रक्कम स्विकारली नाही. दि.16.04.2021 रोजी सापळा आयोजीत केला असता दुय्यम निबंधक कार्यालय, कळंब येथील प्रभारी दुय्यम निबंधक, बंडगर यांनी तक्रारदार यांचेकडुन पंच साक्षीदारासमक्ष 10000/- रु लाच रक्कम स्वतः स्विकारुन त्यांचे खाजगी ड्रायव्हर यांचेकडे दिल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. यावरुन त्यांचेविरुध्द पोलीस ठाणे कळंब येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कारवाई मा. पोलीस अधीक्षक डॉ.राहुल खाडे, मा.अपर पोलीस अधीक्षक डॉ.अनिता जमादार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद व श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.उस्मानाबाद यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.गौरीशंकर पाबळे, पोलीस निरीक्षक यांनी केली असुन सदर कारवाईस पोह/इफ्तेकार शेख, पोकॉ/विष्णु बेळे, विशाल डोके व चालक पोना/दत्तात्रय करडे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकीय अधिकारी/कर्मचारी 1) महाराष्ट्र शासनाचे मानधन, अनुदान घेणारी व्यक्ती 2) खाजगी इसम शासकिय कामाकरिता अथवा शासकीय काम करुन दिले बद्दल लाचेची मागणी करीत असतील तर कृपया खालील मोबाईल, दूरध्वनीवर, टोल फ्री क्रमांकावर, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे मोबाईल ॲप्सद्वारे www.acbmaharashtra.net या संकेतस्थळावर तक्रारी नोंदविण्यासाठी संपर्क साधावा.

मोबाईल क्रमांक :-

1) मा.डॉ.राहुल खाडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.विभाग, औरंगाबाद मोबाईल क्रं. 8888807299
2) श्री.प्रशांत संपते, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, उस्मानाबाद मो.नं. 9527943100
3) टोल फ्री क्र. 1064, दूरध्वनी क्र.- 02472-222879

E-Mail ID:- dysposmanabad@gmail.com

(गौरीशंकर पाबळे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, उस्मानाबाद

Scanned with CamScanner